# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ०७/०८/२०१८ रोजी (का.प.क्र.०६) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त

मंगळवार दिनांक ०७/०८/२०१८ रोजी (का.प.क्र.०६) मा.सभापती श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे सकाळी ११:३० वाजता वंदेमातरम् या गिताने सुरु झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त,श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगर सचिव,श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
०२. स.स.श्री.सिध्दांत संजय शिरसाट
०३. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
०४. स.स.श्रीमती शेख नरगीस सलीम
०५. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
०६. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे
०७. स.स.श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे
०८. स.स.श्री.पुनमचंद सोनाजी बमणे
०९. स.स.श्रीमती खान सायराबानो अजमल
१०. स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान
११. स.स.श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर
१२. स.स.श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी
१३. स.स.श्री.अब्दुल नविद अब्दुल रशीद

चर्चा :

श्री.गजानन बारवाल : स.सदस्य श्रीमती जयश्री कुलकर्णी यांच्या मातोश्री श्रीमती विजया वसंतराव वैद्य यांचे दुःखद निधन झाले आहे त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली देण्यात यावी.

मा.सभापती : सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

श्रीमती.शेख नरगीस : वार्डामध्ये कुत्र्यांनी लहान मुलांना चावा घेतला आहे. श्री.नाईकवाडे यांना सांगुन सुध्दा काहीच कार्यवाही होत नाही.

श्री.रुपचंद वाघमारे : आता पर्यंत वार्डामध्ये कुत्रे पकडण्याची गाडी देण्यात आलेली नाही. येता जाता नागरीकांना कुत्र्यांचा त्रास सहन करावा लागत आहे.

श्री.गजानन बारवाल : कुत्र्यांचा प्रश्न खुप गंभीर आहे यामध्ये वेळीच उपाय योजना करणे गरजेचे आहे. कुत्रे पकडण्यासाठी आसाम वरुन आलेले काही तज्ञ व्यक्ती होते त्यांची नेमनुक महानगरपालिकेतर्फे करावी.

पशुसंवर्धन अधिकारी : डॉग वॅन रात्री पाठवली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी काही कुत्रे पकडले आहे.

मा.सभापती : ज्या भागात डॉग वॅन जाते तेथील नगरसेवकांना कळवले पाहिजे.

श्री.गजानन बारवाल : डॉग वॅन वाढवुन देण्याचे मागच्या वेळेस सांगितले होते त्याचे काय झाले.

पशुसंवर्धन अधिकारी : अकाऊंडला चेक गेलेला आहे. प्रोसेस चालु आहे.

मुख्यलेखाधिकारी : व्हावचर सहित चेकला दिलेले आहे. सात लाखाचे व्हावचर आहेत. लगेच मान्य केले जाईल.

मा.सभापती : आजच्या आज पुर्ण कामे करुन घ्यावे. मंजुरी द्यावी.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर : डॉग सेंटरसाठी पण निधी उपलब्ध करुन देण्याचे सांगितले होते.

पशुसंवर्धन अधिकारी : पडेगाव भागात डॉग सेंटर उभारायचे आहे. त्या संदर्भात बजेटमध्ये तरतुद सुध्दा केलेली आहे. त्याच्या इस्टीमेंन्टसाठी पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मा.सभापती : तुम्ही वैयक्तीक त्यांच्याशी बोला जी जागा योग्य असेल आणि मा.आयुक्तांनी मान्यता दिली असेल त्या जागेवर डॉग सेंटर उभारावे.

श्रीमती.जयश्री कुलकर्णी : डॉग वॅन सकाळी न पाठवता संध्याकाळी कूत्रे पकडण्याकरिता पाठवण्यात यावी.

पशुसंवर्धन अधिकारी : संध्याकाळी कुत्रे पकडण्याची गाडी पाठवण्यात येईल.

श्री.अब्दुल नविद : श्री.नाईकवाडे फोन सुध्दा उचलत नाही.

मा.सभापती : नगरसेवकांचे फोन उचलावे परत अशा तक्रारी येता कामा नये.

श्रीमती.स्वाती नागरे : मागच्या वेळेस सांगितले होते की वार्डात कुत्रे पकडण्याची गाडी पाठवण्यात येईल अजुन सुध्दा गाडी आलेली नाही.

पशुसंवर्धन अधिकारी : चिकलठाणा येथील कचरा डेपोजवळ पुष्कळ कुत्रे झाल्यामुळे गाड्या तिथे अडकलेल्या आहेत.

मा.सभापती : वार्डामध्ये वाचनालय, व्यायाम शाळा, हॉल आहे. त्या ठिकाणी कुठल्याच प्रकारचे संरक्षन नाही. वार्डातले चंदनाचे झाड चोरी झाले आहे.

मा.सभापती : स्वतः त्याची पाहणी करु आणि जी काही आवश्यक ती कारवाई असेल ती करु.

श्रीमती.जयश्री कुलकर्णी : वार्डामध्ये ७५० लाईट पैकी १२८ लाईट बंद आहे.त्याची यादी आम्ही केलेली आहे.

कार्यकारी अभियंता(वि) : लाईट दुरुस्तीचे का स.सदस्यांना विश्वासात घेऊनच करत आहोत. दोन तीन दिवसामध्ये काम पुर्ण होईल.

श्रीमती.स्वाती नागरे : अर्ध्याच्यावर वार्डातले लाईट बंद झालेले आहेत.

कार्यकारी अभियंता(वि) : एलईडीचे काम सध्या बंद आहे आणि देखभाल दुरस्तीच्या बाबत काम सुरु आहे.

मा.सभापती : कॉन्ट्रॅक्टर कडुन ताबडतोबीने कामे करुन घ्यावी. आजच्या आज निवेदा प्रक्रिया पुर्ण करावी.

श्रीमती.शेख नरगीस : पाच दिवस झाले वार्डात पाणी आलेले नाही.

कार्यकारी अभियंता(पा.पु) :एमएसीबीच्या प्रोब्लेममुळे ही अडचण आली आहे. तीन चार दिवसात पाणी सुरळित देण्यात येईल.

मा.सभापती : लवकरात लवकर पाणी पुरवठा सुरळित करण्यात यावा.

श्री.सिध्दांत शिरसाट : माझ्या वार्डात बनेवाडी येथील २५ लाखाचे पाण्याचे काम दिले आहे. ते वाटाघाटीसाठी थांबले होते. श्री.कोल्हे यांनी सांगितले होते की, ठेकेदाराला १५ टक्के अबाऊ पुरत नाही म्हणुन हे टेंडर रिकॉल करणार आहे. याचे काय झाले याचा खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता(पा.पु) : कमिटीच्या फाईल मा.आयुक्तांकडे पाठविल्या होत्या त्या संदर्भात कालच टेंडर झाले की, समिती पुढे प्रस्ताव आणणार. पुढच्या बैठकीमध्ये प्रस्ताव आणण्यात येईल.

श्री.सिध्दांत शिरसाट : यांच म्हणणे आहे की, १५ टक्के अबाऊ देता येत नाही. मग वार्ड क्र.३१ शिवनेरी कॉलनीमध्ये १८ लाखाचे काम मंजुर आहे आणि दुसरीकडे वार्ड क्र.३० मध्ये १ कोटी ३० लाखाच्या कामाला २७ टक्के अबाऊ कसे काय काम दिले?

मा.सभापती : पाणी पुरवठाच्या संदर्भाने अशा अनियमितः भरपुर त्या विभागामध्ये आहेत. एकाच कामाचे कॉन्ट्रॅक्ट एका वार्डामध्ये १० टक्के अबाऊ आणि दुसऱ्या वार्डामध्ये २० टक्के अबाऊ, तिसऱ्या वार्ड मध्ये ३० टक्के या सगळ्यांचा एक चौकशी अहवाल करुन येणाऱ्या बैठकीमध्ये सादर करावा.

श्रीमती.सत्यभामा शिंदे : वार्डामध्ये दहा वर्षापुर्वी दहा हजार घरे होती. त्यावेळी पाणी येण्याचा एक टप्पा होता परंतु दोन वर्षापासुन सांगत आहे की, दोन टप्पे करा आता तीन मजली घरे झालेली

आहेत. ३० हजार लोक संख्या आहे. नागरीक पाण्यासाठी खुप त्रस्त आहे. ४० मिनीटात एका टप्प्यामध्ये कसे पुर्ण वार्डात पाणी मिळेल. दोन टप्पे करण्यात यावे.

कार्यकारी अभियंता(पा.पु) : पाण्याच्या कॉन्टेटी प्रमाणे पुर्वी प्रमाणे सप्लाय करत आहोत. स.सदस्यांची वाढीव डिमांड आहे तेवढे पाणी आपल्याकडे शिल्लक नाहीत.

मा.सभापती : पाणी जास्त यावे त्यासाठी काही उपाययोजना करत आहात का?

कार्यकारी अभियंता :त्यासाठी एक तज्ञ समिती करणार आहे.पाणी वाढवण्यासाठी त्यांची मदत घ्यायची आहे.

श्रीमती.सायरा बानो : शहागंजमध्ये अग्नीशमन केंद्रसाठी मंजुरी मिळालेली आहे त्याचे टेंडर पास झाले आहे. ज्या गुप्तेदाराला याचे काम देण्यात आले होते त्याने एक वर्षापासुन ते काम केले नाही. महानगरपालिकेने त्याला ब्लॅकलिस्ट केले आहे. रिटेंडर का करण्यात आले नाही.

कार्यकारी अभियंता : पदमपुऱ्यातले केंद्राचे काम ९० टक्के काम पुर्ण झाले आहे. उर्वरित अग्नीशमनची एक जागा डिस्पुट आहे त्याच्या डिस्पुट सॉल करण्यासाठी सिडकोशी चर्चा करणार आहे. बाकीचे टेंडर कॉल करण्यात आलेले आहे.

मा.सभापती : ज्यांच्या निवेदा झाल्या नाहीत त्या निवेदावर काय कार्यवाही होईल.

कार्यकारी अभियंता : पुढच्या बैठकी पर्यंत सांगतो.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : टॅक्स वसुलीसाठी नवीन किती कर्मचारी लावलेले आहेत आणि रोज किती वसुली होते?

करमुल्य निधी व संकलक : टॅक्स वसुलीसाठी वर्ग तीन आणि वर्ग चार चे १०२ कर्मचारी आहे आणि एजन्सिमार्फत १३५ कर्मचारी आहेत. प्रत्येक वार्डामध्ये १५ कर्मचारी आहेत. वसुलीमध्ये मागच्या वर्षीपेक्षा आठ कोटीने पुढे आहोत. सध्या १५ ते २० लाख रुपये रिकव्हरी होत आहे. ५० हजार प्रोपर्टीचे सर्व्हेक्शन झाले आहे. पाच जुन ला चालु झाले होते. दोन महिने झाले आहे.

श्रीमती.जयश्री कुलकर्णी : माझ्या वार्डामध्ये टेबल टेनिस हॉल आहे. खुप दिवसापासुन तो बंद आहे त्यामुळे दारु पिणाऱ्यांचा तो अड्डा झाला आहे. त्याबाबत नागरीकांकडुन खुप तक्रारी येत आहे.

मा.सभापती : वार्ड क्र.७७ मध्ये जो टेबल टेनिस हॉल आहे त्या ठिकाणी वाचनालय करुन टाकावे. त्या दृष्टिने कार्यवाही करावी.

श्री.गजानन बारवाल : विद्यानगर गारखेडा भागामध्ये स्वामी समर्थ हॉल असून तो भाड्याने देण्यासाठी रेडीरेकनर दराने कार्यवाही होत आहे, परंतु अशा प्रकारचे हॉल, सामाजिक सभागृह भाडेतत्वावर देण्यासाठी दिनांक २१/०२/२०१५ ठराव क्र.७५३ नुसार सर्वसाधारण सभेमध्ये निर्णय झालेला आहे की, सामाजिक संस्थेने मागणी केलेली असेल व सदर सामाजिक संस्था १०० टक्के समाजासाठी कार्य करीत असेल तर, अशा सामाजिक संस्थांना सामाजिक सभागृह, हॉल रू.१०००/- प्रमाणे मासिक भाडे आकारून देण्यांत यावे. सर्वसाधारण सभा ही सर्वोच्च सभागृह आहे, सभेने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी व्हावी. या संस्थेस देखील रू.१०००/- प्रमाणे मासिक भाडे आकारणी करावी, अशी दुरूस्ती करण्यांत यावी.

मा.सभापती : मागील सभेमध्ये दिनांक ३१/०७/२०१८ (का.प.क्र.०५) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेतील ठराव क्र.६७ यामध्ये वॉर्ड क्र.७८ विद्यानगर मधील जयभवानी गृह निर्माण संस्थेमधील समाजमंदिर श्री.स्वामी समर्थ अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र, गारखेडा यांना भाडेतत्वावर देण्यात आले आहे. परंतु सदर संस्था ही १०० टक्के सामाजिक कार्य करीत असल्याने व सदर संस्थेने कमीत कमी

दरात सदर समाजमंदिर उपलब्ध करून देण्याची मागणी केलेली असल्याने, सदर समाजमंदिरासाठी रू.१०००/- प्रमाणे भाडे आकारणी करणे अशी दुरूस्ती करण्यांत येते. यापूर्वी अशा सामाजिक संस्थाना रू.१०००/- प्रमाणे भाडे आकारणीचा धोरणात्मक निर्णय सर्वसाधारण सभेत दि.२१/०२/२०१५ ठराव क्र.७५३ नुसार घेतलेला आहे. त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, सर्वसाधारण सभा हे सर्वोच्च सभागृह आहे व त्याची अंमलबजावणी प्रशासनाने करणे आवश्यक आहे. याचीही दखल घेण्यात यावी. दुरूस्तीसह मंजुरी देण्यांत येते.

श्री.गजानन बारवाल : सेवा निवृत्त लोकांना पेन्शन वेळेवर भेटत नाही. त्याबाबत खुलासा करण्यात यावा.

मुख्यलेखाधिकारी : पेन्शन वेळेवरच जात आहे.मागच्या महिन्याची नियमित पेन्शन आदा केलेली आहे.

मा.सभापती : तक्रारी येणार नाही याची काळजी घ्यावी.

श्री.गजानन बारवाल : श्री.प्रभुलाल जैस्वाल यांनी महानगरपालिकेमध्ये ३४ वर्ष काम केले आहे. त्याला ठेकेदार परवाना मिळावा त्यास मान्यता द्यावी.

मा.सभापती : संबंधीत विभागाने याची नोद घ्यावी आणि योग्य ती कार्यवाही करावी.

**विषय क्र. ७० :**

दिनांक ०२/०७/२०१८ रोजी (का.प.क्रं.०३) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

मा.सभापती : विषय क्र.७०,७१,७२,७३,७४ मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

दिनांक ०२/०७/२०१८ रोजी (का.प.क्रं.०३) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणेस मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. ७१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.३५ नारेगाव येथील पटेलनगर, अजीजनगर, परिसरामध्ये नविन ड्रेनेज लाईन टाकणे, या कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागाच्या सन-२०१५-१६ च्या दरसुची नुसार रक्कम रु.४९,८९,६०२/- चे तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील प्रो-पुअर बजेट या लेखाशिर्षा मधून प्रस्तावित आहे. सदर अंदाजपत्रकास दिनांक २३/०७/२०१८ रोजी मान्यता दिलेली आहे.

तरी वार्ड क्र.३५ नारेगाव येथील पटेलनगर,अजीजनगर, परिसरामध्ये नविन ड्रेनेज लाईन टाकणे. या कामाचे र.रु.४९,८९,६०२/-चे अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३५ नारेगाव येथील पटेलनगर, अजीजनगर, परिसरामध्ये नविन ड्रेनेज लाईन टाकणे, या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.४९,८९,६०२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.०९ अंतर्गत रविनगरमध्ये विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.३१,६८,९००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुची २०१७-१८ नुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च प्रस्तावित २०१८-१९ मधील नविन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.३१,६८,९००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.०९ अंतर्गत रविनगरमध्ये विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.३१,६८,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.०९ अंतर्गत सुदर्शननगर येथील शरद हॉटेल मागील विविध ठिकाणच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटींग करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.४३,९०,०००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुची २०१७-१८ नुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च प्रस्तावित २०१८-१९ मधील नविन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.४३,९०,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.०९ अंतर्गत सुदर्शननगर येथील शरद हॉटेल मागील विविध ठिकाणच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटींग करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.४३,९०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४ :**

विषय :- वार्ड क्र.१०९ श्री.गटकाळ यांच्या घरापासून अथर्व पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे या कामाचे ठेकेदार एस.एम.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रु.३९,९९,६२०/- पर्यंत करुन घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.AMCA-२७५०७३-१ सन २०१७-२०१८

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता-२ महानगरपालिका औरंगाबाद |
| २ | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.१०९ श्री.गटकाळ यांच्या घरापासून अथर्व पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | ३९,९९,६२०/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | ३९,९९,६२०/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | ई-टेंडर विभाग महानगरपालिका औरंगाबाद |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | २५/०१/२०१८ ते ०५/०२/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ०८/०२/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | तीन |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | एस.एम. कन्स्ट्रक्शन | ३९९९६१९.९० | ०.००% दराने |
| ०२. | रुद्रा कन्स्ट्रक्शन | ४०३९६१६.१० | १.००% जास्त दराने |
| ०३. | अभय भोसले | ४०७९६१२.३० | २.००% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | नविन काँक्रीट रस्ते |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय |
| तरी विषयांकित प्रकरणी ठेकेदार एस.एम. कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रु.३९,९९,६१९/- पर्यंत करुन घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१०९ श्री.गटकाळ यांच्या घरापासून अथर्व पर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटींग करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार एस.एम.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रु.३९,९९,६२०/- पर्यंत करुन घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७५ :**

विषय :- वार्ड क्र.४२ किराडपुरा अंतर्गत राम मंदिर ते पटेल हॉटेल पर्यंत रस्ता व्हाईट टॉपींग करणे कामाची निविदा मागितली असता ठेकेदार मुजीब उर रहेमान खान यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.९९% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.९९,९०,०२९/- पर्यंत भरलेली होती. परंतु दि.२७/०७/२०१८ रोजी निविदा समितीनी सदरील काम ७% कमी दराने करण्याचे मंजूर केलेले आहे. म्हणुन अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस /कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्र.२०१८-AMCA-२९९३४५-२

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | वार्ड अभियंता कार्यालय क्र.०३ |
| २ | कामाचे स्वरुप | व्हाईट टॉपींग करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | र.रु.९९,९०,०२९/- मा.स्थायी समिती ठराव क्र.३२४ दिनांक १९/०३/२०१८ |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | ९९,९०,०२९/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | तत्कालीन ई-निविदा विभागामार्फत |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | २२/०३/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ०४/०५/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०४ |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.मुजीब उर रहेमान खान | ९२,९०,७२६/- | ७% कमी दराने |
| ०२. | श्री.मस्कट कन्स्ट्रक्शन | ९९,९०,०२९/- | अ.प. दराने |
| ०३. | श्री.रुद्रा कन्स्ट्रक्शन | १,०३,८८,६३१/- | ३.९९% जास्त दराने |
| ०४. | श्री.आर.टी. कन्स्ट्रक्शन | १,०५,८८,४३२/- | ५.९९% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | निविदा समिती सभा दि.२७/०७/२०१८ ची मंजूरी |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | मा.महापौर यांनी सुचविलेले अत्यावश्यक कामे |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | मा.स्थायी समिती सभा दि.१९/०३/२०१८ विषय क्र.३२४ |

तरी विषयांकित काम ठेकेदार मुजीब उर रहेमान खान यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.९२,९०,७२६/- पर्यंत करुन घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

श्री.गजानन बारवाल : वार्ड क्र.४२ किराडपुरा या ठिकाणी जे काम झाले ते अर्धवट आहे. त्यामुळे तेथील नागरीकांना येण्या जाण्यासाठी त्रास होत आहे. ते काम पुर्ण करण्याचे आदेशित करावे.

मा.सभापती : ते काम अर्धवट कशामुळे पडले आहे ते बघण्यात यावे आणि ते काम त्वरित करण्यात यावे. विषय क्र.७५ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४२ किराडपुरा अंतर्गत राम मंदिर ते पटेल हॉटेल पर्यंत रस्ता व्हाईट टॉपींग करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार मुजीब उर रहेमान खान यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.९२,९०,७२६/- पर्यंत काम करुन घेणेस अधिक टेंडर अटी /शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ७६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.३० अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हरब्लॉक बसविणे (रंजनवन सोसायटीच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूस) या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.३४,०६,५४३/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुची २०१७-१८ नुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च प्रस्तावित २०१८-१९ मधील नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.३४,०६,५४३/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : ऐनवेळीचा विषय क्र.७६ व ७७ मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३० अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हरब्लॉक बसविणे (रंजनवन सोसायटीच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूस) या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.३४,०६,५४३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७७ :**

विषय :- वार्ड क्र.५३ औरंगपुरा अंतर्गत दलालवाडी कामगार कॉलनी तसेच इतर ठिकाणी काँक्रीटीकरण करणे, या कामाचे ठेकेदार धर्मा कन्स्ट्रक्शन,औरंगाबाद यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रु.३३,२८,७९६/-पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील करार मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ :- टेंडर क्रमांक/Tender ID-2016-AMCA-184955-9 सन २०१७-१८

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | उप अभियंता झोन क्र.०२ |
| २ | कामाचे स्वरुप | रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | रक्कम रू.३४,९५,२३७/- मा.स्थायी समिती विषय क्र.५१, दिनांक ११/११/२०१६ |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रक्कम रू.३३,२८,७९६/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | ई-महाटेंडर विभाग जा.क्र./मनपा/वार्ड-अभि-२/१७७/२०१६ दि.१४/१२/२०१६ |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | २८/०३/२०१८ ते ०६/०४/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ०९/०४/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | एक |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| **अ.क्र.** | **ठेकेदाराचे नाव व पत्ता** | **टेंडर रक्कम रुपये** | **पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त** |
|---|---|---|---|
| ०१. | धर्मा कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | ३३,२८,७९६/- | अंदाजपत्रकीय दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | नवीन काँक्रीट रस्ते |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नवीन काँक्रीट रस्ते |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | लेखा विभाग,महानगरपालिका, औरंगाबाद |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय |
| तरी विषयांकित काम ठेकेदार धर्मा कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रु.३३,२८,७९६/- पर्यंत करुन घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५३ औरंगपुरा अंतर्गत दलालवाडी कामगार कॉलनी तसेच इतर ठिकाणी काँक्रीटीकरण करणे, या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक ठेकेदार धर्मा कन्स्ट्रक्शन,औरंगाबाद यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रु.३३,२८,७९६/- पर्यंत काम करुन घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**दिलीप सुर्यवंशी**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद